**पंतप्रधानांची ओमानचे माननीय सुल्तान यांच्याशी भेट (18 डिसेंबर 2025)**

18 डिसेंबर 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज मस्कत येथे ओमानचे माननीय सुल्तान हैथम बिन तारिक यांच्याशी द्विपक्षीय बैठक केली. राजवाड्यामध्ये आगमन होताच माननीय सुल्तानांनी पंतप्रधानांचे हार्दिक स्वागत केले व त्यांना औपचारिक सन्मान प्रदान केला.

2. उभय नेत्यांची परस्परांशी तसेच शिष्टमंडळ स्तरावर चर्चा झाली. त्यांनी भारत–ओमानच्या बहुआयामी धोरणात्मक भागीदारीचा सर्वंकष आढावा घेतला आणि द्विपक्षीय संबंधांमधील वाढीबद्दल समाधान व्यक्त केले. यावर्षी दोन्ही देश राजनैतिक संबंध स्थापनेची 70 वर्षे साजरी करत असल्याने, ही भेट भारत–ओमान संबंधांच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची असल्याचे दोन्ही नेत्यांनी नमूद केले.

3. त्यांनी सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारावर (सीईपीए) झालेली स्वाक्षरीचे स्वागत करून ही द्विपक्षीय संबंधांमधील एक महत्त्वपूर्ण घडामोड असून यामुळे धोरणात्मक भागीदारीला मोठी चालना मिळेल, असे सांगितले. द्विपक्षीय व्यापाराने $10 अब्ज टप्पा ओलांडल्याबद्दल तसेच परस्पर गुंतवणूकीचा ओघ पुढे जात असल्याबद्दल समाधान व्यक्त करताना, CEPA मुळे द्विपक्षीय व्यापार व गुंतवणुकीला लक्षणीय प्रोत्साहन मिळेल, रोजगारनिर्मिती होईल तसेच दोन्ही देशांमध्ये असंख्य नव्या संधी निर्माण होतील, हे पंतप्रधानांनी अधोरेखित केले.

4. उभय नेत्यांनी दीर्घकालीन ऊर्जा करार, नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प आणि हरित हायड्रोजन व हरित अमोनिया प्रकल्पांद्वारे ऊर्जा सहकार्याला नवीन चालना देण्यावरही चर्चा केली. पंतप्रधानांनी आंतरराष्ट्रीय सौर आघाडी यामध्ये ओमानने सहभाग घेतल्याबद्दल त्यांचे कौतुक केले आणि आपत्ती-प्रतिरोधक पायाभूत सुविधा आघाडी तसेच जागतिक जैवइंधन आघाडी यामध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले.

5. पंतप्रधानांनी नमूद केले की कृषी विज्ञान, पशुसंवर्धन, मत्स्यपालन तसेच भरड धान्यांच्या लागवडीसह कृषी क्षेत्रातील सहकार्यामुळे दोन्ही देशांना फायदा होऊ शकतो.

6. शिक्षण क्षेत्रातील सहकार्याचे महत्त्व ओळखून, अध्यापकवर्ग व संशोधकांच्या देवाणघेवाणीतून दोन्ही देशांना परस्पर लाभ होईल, असे दोन्ही नेत्यांनी नमूद केले.

7. अन्नसुरक्षा, उत्पादन, डिजिटल तंत्रज्ञान, महत्त्वाची खनिजे, लॉजिस्टिक्स, मानव-संसाधन विकास तसेच अंतराळ सहकार्य या क्षेत्रांतील सहकार्यावरही दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली.

8. वित्तीय सेवांच्या बाबतीत, UPI आणि ओमानच्या डिजिटल पेमेंट प्रणालीमधील सहकार्य, RuPay कार्डचा स्वीकार तसेच स्थानिक चलनांमध्ये व्यापार करण्यावरही चर्चा करण्यात आली.

9. खते तसेच कृषी संशोधन ही उभय बाजूंसाठी फायदेशीर असल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले आणि संयुक्त गुंतवणुकीसह या क्षेत्रांतील सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी काम करण्याची गरज अधोरेखित केली.

10. उभय नेत्यांनी सागरी क्षेत्रासह संरक्षण व सुरक्षा सहकार्य अधिक वृद्धिंगत करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

11. पंतप्रधानांनी ओमानमधील भारतीय समुदायाच्या कल्याणासाठी माननीय सुल्तानांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल त्यांचे आभार मानले. त्यांनी विश्वास व्यक्त केला की, सागरी वारसा, भाषा प्रोत्साहन, युवा आदान-प्रदान तसेच क्रीडा संबंध या क्षेत्रांतील अनेक नव्या द्विपक्षीय उपक्रमांमुळे उभय देशांतील जनतेमधील संबंध अधिक दृढ होतील. उभय देशांनी सामायिक केलेल्या समृद्ध सांस्कृतिक वारशावरही त्यांनी चर्चा केली आणि सागरी संग्रहालयांमधील सहकार्य, तसेच कलाकृती व कौशल्यांची देवाणघेवाण याच्या महत्त्वावर भर दिला.

12. ओमान व्हिजन  2040 आणि भारताचे' 2047 पर्यंत विकसित राष्ट्र किंवा विकसित भारत बनण्याचा संकल्प यांच्यातील समन्वयाचे दोन्ही नेत्यांनी स्वागत केले आणि आपल्या जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी परस्परांना पाठिंबा दर्शवला.

13. दोन्ही नेत्यांनी प्रादेशिक तसेच जागतिक घडामोडींवरही चर्चा केली आणि प्रादेशिक शांतता व स्थिरतेसाठी आपली वचनबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित केली.

14. या भेटीच्या निमित्ताने, CEPA व्यतिरिक्त, सागरी वारसा, शिक्षण, कृषी तसेच भरड धान्य लागवड या क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार/व्यवस्थांवर स्वाक्षरी करण्यात आल्या. या भेटीतील परिणामांची संपूर्ण माहिती येथे पाहता येईल [लिंक]. या भेटीच्या निमित्ताने संयुक्तपणे स्वीकारलेले निवेदन येथे पाहता येईल [लिंक].

मस्कत

18 डिसेंबर 2025